दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३४६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१२ मार्च २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# मालमत्ता कराच्या विरोधात खारघर ते पनवेल लाँग मार्च






**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगर पालिकेच्या जिझिया मालमत्ता कराच्या विरोधात खारघर ते पनवेल असा लाँग मार्च काढण्यात आला. नवी मुंबई ९५ गावं नैना व इतर प्रकल्पग्रस्त समितीच्यावतीने हा लाँग मार्च काढण्यात आला होता.

या लाँग मार्चमध्ये आ बाळाराम पाटील, दि. बा. पाटील प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष व शिवसेना सल्लागार बबनदादा पाटील, ॲड. सुरेश ठाकूर, विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, दि. बा. पाटील प्रकल्पग्रस्त समितीचे सचिव सुदाम पाटील, शिव–सेना तालुका प्रमुख एकनाथ म्हात्रे, शंकर ठाकूर, नगरसेवक अरविंद म्हात्रे, मनसेचे केसरीनाथ पाटील, पंचायत समिती सदस्य काशिनाथ पाटील, मा नगरसेवक शंकर म्हात्रे, आदींसह मोठ्या प्रमाणात विविध पक्षांचे पदाधिकारी, यात सहभागी झाले होते. यावेळी खारघर पोलिसांनी सदर मोर्च्या करीना ताब्यात घेतले. यावेळी शिष्ठमंडळाने पनवेल महानगरपालिकेकडे धाव घेऊन आपले म्हणणे त्यांच्या समोर मांडले यावेळी प्रामुख्याने पनवेल महानगरपालिके मार्फत सन २०१६ ते २०२१ या कालावधी करिता कोणताही अभ्यास न करता तसेच कोणत्याही सुविधा न पुरविता आकारलेल्या आवाढव्य जिझिया मालमत्ता कर त्वरित रद्द करावा.

शहरातील बहुतांशी इमारती भुखंड सिडकोच्या मालकीचे असून ते गृहनिर्माण संस्थांना, नागरीकांना भाडेपट्ट्यावर दिले असून ते लिज होल्ड असल्याने व सिडको सेवाशुल्क व भाडेपट्टा वसूल करीत असल्याने त्या सर्व इमारती भुखंड यांचा मालमत्ता कर सिडको कडून वसूल करण्यात यावा. पनवेल महापालिकेच्या ग्रामीण भागातील भूमिपुत्रांच्या जमिनी शासनाने कवडीमोल भावाने खरेदी करून त्या सिडको एमआयडीसी यांना विकासासाठी दिल्या असून गेल्या ५० वर्षात ग्रामीण भागात शासनाने/ सिडको/एमआयडीसी यांनी कोणताही पायाभूत नागरी सुविधा, ज्या महाराष्ट्र राज्य पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार उपलब्ध करून देणे बंधनकारक असताना जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून पुरविल्या नसल्याने त्यासाठी आकारण्यात येणारा मालमत्ता कर सिडको/एमआयडीसी/ राज्य सरकार कडून महापालिकेने वसूल करावा, महापालिकेकडून गृहनिर्माण संस्थां ,हॉटेल ,व्यापारी संस्था यांच्याकडून जबरीने वसूल करण्यात येणार कचरा व्यवस्थापन कर बाबत निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा, खारघर कलंबोली कामोठे सह तळोजा एमआयडीसी तसेच २९ गावे पनवेल महापालिकेतून वगळण्यात यावीत यासाठी जनमत घेण्यात यावे. अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### सर्वच क्षेत्रात विकासाची मोठी भरारी घेणारा अर्थसंकल्प

# पंचसूत्रीच्या यशस्वी अंमलबजावणीतून एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेची उद्दिष्टपूर्ती : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोना संकटावर मात करून राज्याच्या सर्वांगीण विकासाची मोठी भरारी घेणारा अर्थसंकल्प राज्य विधीमंडळात सादर झाला असून यात निश्चित करण्यात आलेल्या विकासाच्या पंचसूत्रीमुळे एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे राज्याचे उद्दिष्ट पूर्णत्वाला जाईल असा विश्वास मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी अर्थसंकल्पातून कृषी, आरोग्य, मनुष्यबळ विकास, दळ–णवळण, उद्योग क्षेत्राच्या विकासाला बुस्टर डोस मिळाल्याचे सांगतांना हा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसाच्या, समाजातील दुर्बल घटकांच्या हिताची जोपासना करत असल्याचेही म्हटले आहे.



कोरोनाचे संकट, निसर्गाचा लहरीपणा यामुळे राज्यासमोर अनेक आव्हाने निर्माण झालेली असतांनाही राज्य विकासाची घोडदौड कायम असल्याचे आजच्या अर्थसंकल्पातून स्पष्ट झाल्याचे मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले. ते पुढे म्हणाले की,विकासाच्या पंचसूत्रीसाठी तीन वर्षात ४ लाख कोटी रुपयांचा भरीव निधी उप–लब्ध करून देण्यात आला आहे. कृषी व संलग्न क्षेत्राला या अर्थसंकल्पाने मोठा दिलासा दिला आहे. राज्यातील सिंचन क्षमता वाढवणे, ६० हजार कृषी पंपाना वीज जोडणे देणे, राज्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे, यासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. निर्यातक्षम २१ शेतमालाचे क्लस्टर तयार केल्याने शेतमालाला चांगला भाव मिळेल असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

कोरोनाने जेंव्हा आपल्या आरोग्यासमोर मोठे संकट निर्माण केले तेंव्हा राज्यातील जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी शासनाने मोठ्याप्रमाणात आरोग्य सुविधांचे निर्माण केले. हीच व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे, आरोग्य सेवांचा दर्जात्मक विस्तार करण्याचे नियोजनही अर्थसंकल्पात करण्यात आले आहे. १६ जिल्ह्यात १०० खाटांची स्त्री रुगणालये उभी करण्यात येणार आहेत. वैद्यकीय शिक्षणाचाही गुणात्मक आणि दर्जात्मक विकास करण्यावर यात भर आहे. पुणे शहराजवळ देशातील पहिली वैद्यकीय वसाहत आपण निर्माण करत आहोत.

रोजगारक्षम मनुष्यबळ निर्मितीसाठी इनोव्हेशन हब स्थापन करण्याचा निर्णय या अर्थसंकल्पात घेण्यात आला आहे. नवीन स्टार्टअप्सची राज्यात निर्मिती होऊन त्या माध्यमातून रोजगार संधीत वाढ करण्यासाठी स्टार्टअप फंडासाठी १०० कोटी रुपयांचा निधी अर्थसंकल्पात देण्यात आला आहे.

हा अर्थसंकल्प महिला व बालकांच्या व दुर्बल घटकांच्या हिताच्या रक्षणासाठी, त्यांच्या विकासासाठी आपली कटिबद्धता दाखव–तो. अंगणवाडी मदतनिसांना मोबाईल सेवा देणारी ई शक्ती आपण प्रदान करत आहोत. बालसंगोपन अनुदानात भरीव वाढ करण्यात आली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे प्रत्येक जिल्ह्यात अमृतमहोत्सवी महिला व बाल भवनाची उभारणी करण्याचे अर्थसंकल्पात निश्चित करण्यात आले आहे. नागरी भागातील कुपोषण दूर करण्यावर अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. अल्पसंख्याक, सामाजिक न्याय, इमाव व आदिवासी विभागाच्या योजनांना अर्थसंकल्पात खुप

.../२

# झोपडीला लागलेल्या आगीत एका वृद्ध इसमाचा मृत्यू



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील करंजाडे कॉलेज फाटा येथे आज दुपारच्या सुमारास एका झोपडीला लागलेल्या आगीत वृद्ध इसमाचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

करंजाडे कॉलेज फाटा येथील सेक्टर २ ए, ॲक्सिस बँकेच्या मागील बाजूस असलेल्या एका झोपडीस अचानकपणे आग लागली. या झोपडीमध्ये सादिक विदिक शेख (६५) हे झोपले होते. त्यात त्यांचा दुर्दैवाने होरपळून मृत्यू झाला आहे. तसेच सामानाचे सुद्धा मोठे नुकसान झाले आहे.

या आगीची माहिती मिळताच अग्नीशमन दलाचे बंब व पनवेल शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी रवाना होवून त्यांनी आग आटोक्यात आणली आहे.

## संक्षिप्त...

### मुंबईत रात्री दहा ते सकाळी सहापर्यंत बांधकाम बंद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ध्वनी प्रदूषणाला आपण गंभीरतेने घेत नाही, मात्र हे प्रदूषण अदृश्य असून जीवघेणे आहे. ध्वनी प्रदूषणामुळे अनेकांना त्रास होतो. वयोवृद्धासह लहानग्यांनाही या त्रासामुळे अनेक आजारांना समारं जावे लागते. मुंबईत तर मागील काही दिवसांपासून ध्वनी प्रदूषणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होतेय. याचं मुख्य कारण, रात्रीच्या काळात होणारे बांधकाम आहे. बांधकामावेळी विविध प्रकाराच्या आवाजामुळे त्रास होतो. लहान मुले आणि वयोवृद्धांना याचा जास्त त्रास होतो. याच्या मुंबई पोलिसांकडे गेल्या काही दिवसांपासून अनेक तक्रारी आल्या होत्या. या तक्रारीची दखल घेत पोलीस आयुक्त संजय पांडे यांनी मुंबईमधील बांधकाम रात्री दहा ते सकाळी सहा वाजेपर्यंत बंद करण्याचा आदेश दिला आहे. मुंबईतील ध्वनिप्रदूषण कमी करण्यासाठी पोलिस आयुक्तांनी हे आदेश दिले आहेत. वाढत्या ध्वनिप्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याच्या तक्रारींची गरज पोलीस आयुक्त संजय पांडे यांनी घेतली. त्या दृष्टीने पावले उचललत संजय पांडे यांनी बांधकाम, व्यावसायिक यांच्याशी बैठक घेतली. त्यानुसार बांधकाम व्यावसायिक आणि कामगारांना रात्री दहा ते सकाळी सहा दरम्यान बांधकाम करण्यास बंदी असणार आहे.

# गावठी कट्टा विक्री करताना दोन जणांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने रंगेहाथ पकडले



**दै.रायगड नगरी । कर्जत**

गावठी कट्टा विक्री करताना दोन जण स्थानिक गुन्हे अन्वेशन शाखेने रंगेहाथ पकडले आहेत, अधिक तपास करताना स्थानिक गुन्हे अन्वेशन शाखेने कर्जत मधील तिघा जणांना अटक केली आहे.

दि.१० मार्च २०२२ रोजी स्थानिक गुन्हे अन्वेशन शाखा रायगड अलिबागचे पोलिस हवालदार राजेश पाटील यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मौजे कर्जत नेरळ रोड ने दोन व्यक्ती गावठी कट्टा विक्री करण्या करिता बदलापूर जिल्हा ठाणे येथे जाणार आहेत.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे अन्वेशन शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कदम आणि पोलीस हवालदार राजेश पाटील,पोलीस हवालदार यशवंत झेमसे, पोलीस हवालदार प्रतिक सावंत, पोलीस हवालदार अमोल हंबीर, पोलीस हवालदार देवराम कोरम,पोलीस हवालदार राकेश म्हात्रे या पथकाने एका काळे रंगाचे मोटार सायकल वरून येणाऱ्या दोन संशयीत इसमांना ताब्यात घेतले. त्यांना त्यांची नावं गाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे रविंद्र आनंद वैद्य (वय ३५ वर्षे ) राहणार दहिवली, तालुका कर्जत, सौरभ सुनिल नवले (वय–२६ वर्षे) रा.संत रोहिदास नगर, गुंडगे, तालुका कर्जत अशी असल्याचे सांगितले. सदर इसमांची झडती घेतली असता त्यांचे ताब्यात एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे मिळून आली आहेत. सदर बाबत त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी सदरचा गावठी कट्टा हा सुनिल त्र्यंबक वाठोरे (वय– ३६ वर्षे) रा–हणार पंचशील नगर, गुंडगे, तालुका कर्जत याचे कडून आणला असल्याचे सांगितले. वरील तिन्ही आरोपी त्यांना गुन्ह्याच्या तपासकामी ताब्यात घेण्यात आले आहे.

कर्जत पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर ६४/२०२२, भारताचा हत्यार कायदा १९५९ चे कलम ३, २५ सह भा. द.वि.कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्याच्या कडील २५,०००/– रुपये किमतीचा एक गावठी कट्टा, १०००/– रुपये किमतीची एकूण दोन पितळी काडतुसे,१५०००/– रुपये किमतीची एक काळे रंगाचे पल्सर मोटरसायकल तिचा रजिस्ट्रेशन क्रमांक एम एच –४६ व्ही १४८९ मुद्देमाल जप्त केला आहे

तीन आरोपी पैकी एक जण .../२

# शेकापचे गजानन पाटील आणि सहकारी भाजपात करणार जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील आणि उरण विधानसभा मतदार संघात समाविष्ट असलेल्या दापोली येथील शेतकरी कामगार पक्षाचे माजी उपसरपंच गजानन तुळशीराम पाटील आणि त्यांचे शेकडो सहकारी भारतीय जनता पक्षात जा–हीर प्रवेश करणार असून या प्रवेशातून शेकापला मोठा झटका लागणार आहे.

रविवार दिनांक १३ मार्च रोजी सकाळी १० वाजता खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाच्या सभागृहात हा पक्षप्रवेश सोहळा होणार आहे. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# विनामास्क फिरणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई चालूच राहणार

**दै.रायगड नगरी । आलिबाग**

विनामास्क फिरणाऱ्या इसमांवर करण्यात येणारी दंडात्मक कारवाई बंद करुन विनामास्क केसेस करण्यात येवू नयेत, असे पोलीस अधीक्षक, रायगड यांच्या कार्यालयाकडून पाठविण्यात आलेले दि.०७ मार्च २०२२ चे पत्र समाजमाध्यमांव्दारे फिरत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे.

तरी विनामास्क फिरणाऱ्या इसमांवर करण्यात येणारी दंडात्मक कारवाई बंद करण्याबाबत शासनाकडून कोणत्याही प्रकारचे निर्देश जारी करण्यात आलेले नाहीत,असे निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी कळविले आहे.

विनामास्क केसेस दंड करण्याबाबतचे दि.०७ मार्च २०२२ रोजीचे पत्र अपर पोलीस अधीक्षक, रायगड यांनी त्यांच्याकडील दि.११मार्च २०२२ रोजीच्या पत्रान्वये मागे घेतले आहे.

तरी विनामास्क फिरणाऱ्या इसमांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल तसेच शासनाने कोविड–१९ अनुरुप वर्तनासंदर्भात दिलेल्या अटी व शर्तीचे तंतोतंत पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी,असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मुद्रांक शुल्क व नोंदणी फी सोबत स्थानिक संस्था कर रद्द करा

### आ.प्रशांत ठाकूर यांचा विधिमंडळात तारांकित प्रश्न





**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मुद्रांक शुल्क व नोंदणी फी सोबत स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्क व नोंदणी फी सोबत आकारण्यात येणारा १ टक्के स्थानिक संस्था कर रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी डिसेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मुद्रांक जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिक दुर्बल घटक व अल्प उत्पन्न घटकांना महसूल व वन विभागाकडील राजपत्र क्रमांक मुद्रांक २०१५/१७४५/यूअ–ोआर–२४/सीआर –५७३ दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास सिडकोकडून वितरित केलेल्या सदनिकांच्या दस्तांवर १ हजार रुपये इतके मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात आले असून सदर राजपत्रात आर्थिक दुर्बल घटक व अल्प उत्पन्न घटकांना स्थानिक संस्था .../२

# मत्स्यदुष्काळात सुद्धा होळी सणासाठी मोठा उत्साह



**दै.रायगड नगरी । मुरुड**

मागील वर्षांपासून पासून वादळी वारे अवकाळी पाऊस व तद्नंतर कोरोना च्या पार्श्वभूमीवर झालेला लॉक डाऊन यामुळे स्थानिक मच्छिमार मेथाकुटीला आला होता . परंतु अजूनही संकटाचे ग्रहण सुटत नाही सध्या कोळीबांधवांना खोल समुद्रात मत्स्यदुष्काळाचा सामना करावा लागत आहे त्यामुळे होळी सण साजरा करण्यासाठी कोळीबांधवांच्या होड्या पाच सहा दिवस आधीच गावाकडे फिरकू लागल्या आहेत मासळीला योग्य दर नाही परंतु डिझेल चे दर मात्र गग-नाला भिडलेले आहेत. तरी आशा बिकट परिस्थितीत मिळेल तेवढी मासळी पद-रात पडून आपले कर्तव्य निष्ठेने बजावत समाधानपूर्वक व्यवसाय करीत असताना आलेले सण उत्साहात साजरे करून चेहऱ्यावर दुःखाची सावट न दाखवता होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करणार आहेत .

शासनाच्या मदतीची कोणतीही अपेक्षा न ठेवता मोठ्या मनाने आपली संस्कृती जपत आपला पारंपरिक होळी ( शिमगा ) सण आनंदाने साजरा करण्याचा निश्चय कोळीबांधवांनी केला आहे . होळी हा सण कोळी समाजामध्ये आवडता सण असून तो फार श्रद्धेने साजरा केला जातो या सणाला कोळीबांधव आपल्या होड्या स्वच्छ धुवून त्याला रंगीबेरंगी कापडी पट्ट्या, झुली , वेगवेगळ्या रंगाचे झेंडे व होडीभोवताली फुलांच्या माळा लावून होड्या किनारी लावतात ,किनारी येताना फटाक्यांची आतषबाजी , गुलालाची उधळण करीत वाद्याच्या तालावर नृत्य करीत मोठ्या उत्साहात येतात , खोल समुद्रातून मासेमारी झाल्यावर हि मंडळी मुंबई येथील ससून डॉक (कुलाबा मार्केट) येथे मिळालेली सर्व मासळी विकून आपल्या घरी परतत असताना खंदेरीच्या वेताळ देवाचे दर्शन घेऊनच घरी परतात या देवाची मनोभावे पूजा करून मानपानाचा कोंबडा येथे मोठ्या श्रद्धेने अर्पित केला जातो.यावेळी समस्त कोळी बांधव मंदिरामध्ये एकत्र हात जोडून विनवणी करतात.कि, त्यांच्या नौकेचे,जाळीचे,त्यांच्या जीविताचे रक्षण कर.तसेच पुरेसे नौकेला मासे मिळून दे अशी पार्थना वेताळ देवाकडे केली जाते. याबाबत अधिक माहिती देताना मुरुड कोळीवाड्यातील एकविरा व कमलावती या होड्यांचे मालक चंद्रकांत बाबू सरपाटील म्हणाले कि, होळी सण हा कोळी समाजाचा आवडता सण असून दरवर्षी प्रथेप्रमाणे खांदेरी किल्ल्यावरील वेताळ देवाचे दर्शन घेण्याची आमची परम्परा आहे.

आमच्या बोटीवरील तांडेल व सर्व खलाशी या देवाचे दर्शन घेण्यास जात असतो.येथे केलेली प्रार्थना नेहमी सफल होते अशी आमची भावना व धारणा आहे. त्यामुळे खांदेरी किल्ल्यावरील वेताळ देवाचे दर्शनासाठी मोठी गर्दी आपणास पहावयास मिळते.

यावेळी मुरुड व नांदगाव मधील अनेक भाविकांनी दर्शन घेऊन सफलता मिळण्याची पार्थना केल्याचे चंद्रकांत सरपाटील यांनी सांगितले. रायगड जिल्ह्यामधील सुमारे दहा हजारपेक्षा जास्त होड्या होळी सण साजरा करण्यासाठी सागरी किनाऱ्याला येत असतात, कोळी बांधव गावात आल्यानंतर आपले कुटुंबीय नातेवाईक व मित्रमंडळींबरोबर रममाण होऊन होळीसण उत्साहात साजरा करून सात ते आठ दिवसांनंतर परत मासेमारीसाठी जाण्यासाठी जाळ्या व इतर सामान भरून सज्ज होतात , मोठ्या संख्येत किनाऱ्याला सजविलेल्या होड्यां लागल्याने किनाऱ्यावरील दृश्य विलोभनीय दिसते ,मोठ्या हर्षो आनंदात होळी सण हा कोळी समाजातर्फे दरवर्षी साजरा केला जात असतो.

# उरण विधानसभा युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी रोहित घरत

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण विधानसभा युवक काँग्रेसच्या अध्यक्ष पदी काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ व कट्टर कार्यकर्ते रोहित श्रीकांत घरत यांची पुन्हा एकदा वर्णी लागली आहे. उरण विधानसभा युवक काँग्रेसचा अध्यक्ष कोण असावा यासाठी ऑनलाईन पद्धतीने, लोकशाही पद्धतीने निवडणुका घेतल्या होत्या. तिसऱ्यांदा रोहित घरत हे उरण विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष बनले आहेत. रोहित घरत हे २००८ पासून काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते आहेत.२०१२ साली पनवेल तालुका स्टुडंट कॉलेज काँग्रेस अध्यक्ष पदी त्यांची निवड झाली.२०१४ साली उरण विधानसभा युवक काँग्रेसच्या सरचिटणीस पदी त्यांची निवड झाली.२०१६ साली ते उरण विधानसभा अध्यक्ष म्हणून निवडून आले. परत २०१८ साली रोहित घरत हे बहुमताने अध्यक्ष म्हणून निवडून आले.आता तिसऱ्यांदा म्हणजेच २०२२ साली झालेल्या निवडणुकीत उरण विधानसभा युवक काँग्रेसच्या अध्यक्ष पदी ५६४९ मते मिळवून रायगड जिल्ह्यात १ नंबरची मते मिळविली आहेत.

## कर्जत नगरपरिषद, जिल्हा : रायगड

**लेखा विभाग**

**जा.क्र.कनप/लेखा/४८०/२१-२२, दिनांक ११/०३/२०२२**

### जाहीर प्रसिद्धीकरण

कर्जत नगरपरिषदेच्या हद्दीतील नागरिकांना कळविण्यात येते की, नगरपरिषदेचा सन २०२१-२०२२ चा सुधारित व सन २०२२-२०२३ चा मुळ अर्थसंकल्प नागरिकांना निरिक्षण करिता पुढील १५ दिवसाकरिता नगरपरिषदेच्या लेखा विभागात खुले ठेवण्यात येत आहे.

**सही/-**
**(डॉ.पकंज पाटील)**
**मुख्याधिकारी**
**कर्जत नगरपरिषद**

**सही/-**
**(सौ.सुवर्णा केतन जोशी)**
**अध्यक्ष**
**कर्जत नगरपरिषद**

### जाहीर नोटीस

मौजे : जांभुळपाडा, ता.उरण, जि.रायगड या गावी आमचे अशिलांची वडिलोपार्जित मालकीची खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जांभुळपाडा, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | भोगवटा धारकाचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| २६ | २ ब | ००.८३.०० एकूण पैकी ००.१८.०० | ७.०० | अविनाश रामचंद्र पाटील<br>मदन रामचंद्र पाटील<br>दिलीप रामचंद्र पाटील |

सदर मिळकत ही आमचे अशिल यांचे वडिलोपार्जित मालकीची असून सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही ताबा, कब्जा, वहिवाट, कुळहक्क वगैरे नाही. तसेच सदर मिळकत ही अन्य कोणासही साठेकरार, गहाणखत अगर खरेदीखत अशा कराराने दिलेली नाही. सबब नोटीशीद्वारे जर सदर मिळकतीत कोणाचे काही हक्क हितसंबंध असल्यास कागदोपत्री पुराव्यासह ७ दिवसांचे आत हरकत घ्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकती संबंधी इतर कोणाचेही हक्क व हितसंबंध नाही असे समजून व्यवहार पूर्ण करतील, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : उरण
दिनांक : ११/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.रेणुका मिन्नाथ पाटील**
**शॉप नं.८, ए विंग, यशोकिरण को. ऑप.हौ.सो., सावरकर चौक जवळ, लोखंडीपाडा, पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९६१९०३८५१५**

इंदलकर साहेब यांचे कोर्ट

ॲड.मनोज गाढवे (देशमुख)
ॲड.प्रमोदिनी सावंत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात

फौ.चौ.अर्ज क्र.२५४/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०१/०४/२०२२

श्रीमती.निर्मला गोपाल म्हात्रे उर्फ
निर्मला परशुराम ठाकूर — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत / ग्रामसेवक अधिकारी — सामनेवाला

या जाहीर नोटीसने सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर अर्जदार यांचा जन्म मौजे : गव्हाण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे दि.०४/०६/१९६२ रोजी झाला आहे. सदर अर्जदार यांनी जन्माची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जदार यांचा जन्म मौजे : गव्हाण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे दिनांक ०४/०६/१९६२ रोजी झाला आहे किंवा कसे? हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. ह्या लेखवरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार लागलीच पुरावा घेवून जन्माची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०५ माहे ०३ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

# डॉ. शेखर जांभळे यांची अनियमित व स्थलांतरित विद्यार्थी समिती वर स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी सदस्य पदी निवड

**दै.रायगड नगरी । खोपोली**

सहज सेवा फाउंडेशन ही समाजातील वेगवेगळ्या घटकांसाठी सातत्यपूर्ण कार्य करीत असते. हाती घेतलेले काम तडीस नेणे ही एक हातोटी असलेली संस्था म्हणून जनमानसात उल्लेख आहे.वंचित व उपेक्षित घटकांसाठी कार्य करण्याच्या उद्देश्यातुन ज्यांना खरच शिक्षणाची आवड आहे परंतु घरच्या परिस्थिती मुळे शिक्षण घेऊ शकत नाही, आई-वडील विटभट्टीवर मोलमजुरी करत असणाऱ्या मुलांना व खालापूर तालुक्यातील वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी १९ डिसेंबर २०२१ पासून दर रविवारी महड व शेडवली येथे संस्थेची सहज निसर्ग शाळा सुरू आहे.

समाजप्रति एक आदर्श ठरणाऱ्या या उपक्रमातून समाजात एक वेगळा संदेश मिळत आहे. संस्थेने अनाथ असणाऱ्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करीत असल्याने अनेक दानशूर व्यक्ती व मदतनीस संस्थेच्या कार्यात मदत करीत आहेत. या उपक्रमाची नोंद घेऊन खालापूर तालुक्याचे तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सहजसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे यांची अनियमित व स्थलांतरित विद्यार्थी समिती वर स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी सदस्य म्हणून निवड केलेली आहे.तळागाळातील वंचित व उपेक्षित घटकांना याचा लाभ होईल यासाठी झालेल्या या नेमणुकीचे सर्वत्र कौतुक होत असून समाजातील विविध घटकांनी त्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेची उद्दिष्टपूर्ती : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

मोठी तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे वर्ष महिला शेतकरी व शेतमजूर सन्मान वर्ष म्हणून साजरे होणारे असून महिला शेतकऱ्यांची कृषी योजनेतील ३० टक्क्यांची तरतूद वाढवून ५० टक्के केल्याने महिला शेतकऱ्यांना मोठा आधार मिळेल असे ही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे भारतरत्न लता मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयासाठी १०० कोटी रुपयांचा निधी, थोर समाज सुधारक व महनीय व्यक्तींच्या नावे अध्यासन केंद्रे सुरु करण्यासाठी ३ कोटी रुपयांचा निधी, ऐतिहासिक व महत्वाच्या शाळांचा विकास, मराठी भाषा भवनासाठी निधी देतांना तंत्रचलित नाला सफाईची निश्चिती या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

इलेक्ट्रिक वाहन धोरणास प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग सुविधा वाढविणे, मोठ्या शहरांत सार्वजनिक वाहतुकीचा २५ टक्के हिस्सा इलेक्ट्रिक वाहनांचा असण्यासाठी टाकलेली पाऊले महत्वाची आहेत असेही मुख्यमंत्री म्हणतात. पर्यावरण संरक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिक्षित करणे, माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना सहभागी करणे, नद्यांचे संवर्धन यामुळे पर्यावरण सजगता निर्माण होईल असेही मुख्यमंत्री म्हणाले रस्ते, मेट्रो, बंदरविकास, विमानतळ विकास अशा विविध दळणवळणाच्या साधनांचा दर्जात्मक विकास, गृहनिर्माण क्षेत्रातील उद्दिष्टपूर्ती करण्याला या अर्थसंकल्पाने प्राधान्य दिले आहे. एसटी महामंडळाला ३ हजार नवीन बसगाड्या खरेदी करण्यासाठी तसेच १०३ बसस्थानकाच्या आधुनिकीकरणासाठी भांडवली अर्थसहाय्य करण्याचा निर्णय देखील या अर्थसंकल्पात घेण्यात आला आहे. मुंबई महानगरप्रदेशातील वाहतूक ताण कमी करण्यासाठी नवीन जलमार्गांची निश्चिती करण्यात आली आहे

पिक विमा योजनेत केंद्र सरकारने सुधारणा केली नाही तर शेतकऱ्यांच्या पिक नुकसानीकरिता अन्य पर्यायांचा विचार करण्याचे सुतोवाच या अर्थसंकल्पात करण्यात आले आहे. वसमत येथे मा. बाळासाहेब ठाकरे कृषी संशोधन केंद्र सुरु करण्यात येणार आहे. सोयाबीन व कापूस पिकासाठी विशेष कृती कार्यक्रम आखल्याने विदर्भ मराठवाड्यातील शेतकऱ्यांना यातून मोठा दिलासा मिळणार आहे. मिशन महाग्रामच्या माध्यमातून शाश्वत विकासाचा करण्यात आलेला प्रयत्न, पंडिता रमाबाई स्मृती शताब्दी महिला उद्योजक योजनेची अंमलबजावणी, मुंबई-पुणे, नागपूर येथे स्वातंत्र्य लढ्याशी संबेधित स्थळांचा हेरिटेज वॉक, जिल्हानिहाय महावारसा सोसायट्याची स्थापना, विविध धार्मिक स्थळे आणि परिसर विकासासाठी निधी, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना परदेश शिक्षण शिष्यवृत्ती अशा काही नवीन योजना आणि उपक्रमांची आखणीही या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. विविध करांवरील सवलतीसाठी अभय योजना, नैसर्गिक वायूवरील कर सवलत, मुद्रांक शुल्कात कर सवलत, जलवाहतूकीस चालना देण्यासाठी कर माफी अशा विविध महत्वाच्या घोषणा या अर्थसंकल्पात केल्याने या क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

## दोन जणांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने रंगेहाथ पकडले

भाजपचे विद्यमान नगरसेवक यांचा भाचा आहे, तर एक पोलीस कर्मचारी याचा मुलगा आहे, सौरभ सुनील नवले याचेवर शिरवळ पोलीस ठाणे जिल्हा-सातारा येथे गुन्हा र.नं. २५३/२०२१ शस्त्र अधिनिय ३,२५ अन्वये गुन्हा दाखल आहे. पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्ह्याचा पुढील तपास कर्जत पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक महेश धोंडे हे करीत आहेत.

## विनामास्क फिरणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई चालूच राहणार

करातून सूट दिल्याबाबत उल्लेख नसल्याने मुद्रांक शुल्क १ हजार रुपये बरोबर १ टक्का स्थानिक संस्था कर आकारून अन्याय करत आहे. सदर आवास योजनेतील लाभार्थ्यांचा आर्थिक स्तर लक्षात घेता १ टक्के स्थानिक संस्था कराची रक्कम खुपच जास्त असून अटींमुळे सर्वांना घरे देण्याच्या योजनेला बाधा निर्माण होऊ शकते, त्यामुळे या प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आकारण्यात येणा-या मुद्रांक शुल्क व नोंदणी फी सोबत आकारण्यात येणारा १ टक्के स्थानिक संस्था कर रद्द करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला होता.

राज्याचे महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, शासन अधिसूचना दि. २१.८.२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४९ क नंतर पुढील कलम १४९ ख (१) १४९ क च्या तरतूदींना बाधा न येता, स्थावर मालमत्तेची अनुक्रमे विक्री, व फलोपभोग गहाण यासंबंधीच्या संलेखांवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमान्वये बसवावयाच्या मुद्रांक शुल्कात, जर असा संलेख हा एक किंवा अधिक महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प असलेल्या शहरात स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेशी संबंधित असेल तर, विक्री किंवा दान संलेखाच्या बाबतीत अशा रीतीने स्थित असलेल्या मालमत्तेच्या मूल्यावर व फलोपभोग गहाण संलेखाच्या बाबतीत त्या संलेखात नमूद केल्याप्रमाणे त्या संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेवर एक टक्का या दराने अधिभार आकारून वाढ करण्यात येते आणि ते या अधिनियमांन्वये गोळा करण्यात येते. सदर अधिसूचनेमधून प्रधान मंत्री आवास योजनेस वगळण्यात आल्याचे दिसून येत नाही. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आकारण्यात येणारे मुद्रांक शुल्क व नोंदणी फी सोबत आकारण्यात येणारे १ टक्का शुल्क है उपरोक्त नमूद शासन अधिसूचना दिनांक २१.८.२०१५ नुसार आकारण्यात येत आहे. त्यात डइढ चा समावेश नाही. तसेच हे शुल्क पंतप्रधान आवास योजनेसाठी वगळण्याचा कोणताही प्रस्ताव नाही, असे लेखी उत्तर नामदार बाळासाहेब थोरात यांनी दिले आहे.

### जाहीर नोटीस

मे.ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट साहेब प्रथमवर्ग कर्जत यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.८३/२०२२
ने.ता.१८/०४/२०२२

श्री.हरेश्वर गोविंद कांबरी
वय : ३७ वर्षे, धंदा : शेती
रा.बार्डी, ता.कर्जत, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
सरपंच / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपचांयत चिंचवली
मु.चिंचवली, ता.कर्जत, जि.रायगड — सामनेवाले

अर्ज जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे

अर्जदार यांनी कर्जत येथील ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब, प्रथमवर्ग यांचे कोर्टात चौ.अर्ज ८३/२०२२ हा अर्ज अर्जदार यांनी त्यांचे आजोबा कै.गणपत फुगाजी कांबरी यांचा मृत्यू दि.१८/०५/१९७२ रोजी मु.बार्डी, ता.कर्जत, जि.रायगड येथे झाला. अर्जदार यांच्या आजोबांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत चिंचवली येथे त्यांचे मृत्यू नोंदणी रजिस्टरमध्ये केलेली नसल्याने अर्जदार यांनी त्यांच्या आजोबांच्या मृत्यूची नोंद घेणेकामी मा.कोर्टाकडून आदेश मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जदार यांच्या आजोबांच्या मृत्यूची दि.१८/०५/१९७२ ही नाही व तसा मृत्यू नोंदणीचा आदेश देण्यात येवू नये, असे म्हणणे असेल त्यांनी उपनिर्दिष्ट प्रकरणी मा.कोर्टात दि.१८/०४/२०२२ अथवा ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत हजर राहून आपल्या हरकती लेखी कळवाव्यात जर मुदतीत कोणाकडूनही हरकत उपस्थित झाली नाही तर मा.कोर्ट अर्जदाराचा लागलीच पुरावा घेवून अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचे लाभात त्यांची उशिराने झालेली नोंद करण्याचा आदेश पारित करेल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.०९/०३/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.कर्जत**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.कर्जत**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत श्री.शमसुददोहा इस्लाम खान, रा.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून आमचे अशिल श्री.संतोषकुमाार सिताराम शर्मा व मनोजकुमार राजनारायण राय, रा.रुम नं.४०४ सी विंग, शुभारंभ कॉम्प्लेक्स, नं.१९, सेक्टर २०, खारघर यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत**

| मौजे | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| वावंजे | ७९ | २ | ०-१८-५० पैकी ०-०४-०० गुंठे करिता |

तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रा-हणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ११/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.शशिकांत काळू म्हात्रे**
**ग्राऊंड फ्लोअर, दत्त छाया अपार्टमेंट, पायोनिअर सोसायटी, स्वामी नित्यानंद रोड, युविका हॉटेल जवळ, पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९२०३८४४२४**

## देवकान्हे येथे मोफत गणवेशाचे वाटप

**दै.रायगड नगरी । खांब**

रोहे तालुक्यातील प्रा.शाळा देवकान्हे येथील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

सरपंच तथा रायगड भूषण वसंत भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न करण्यात आलेल्या व शासनाच्या सर्व शिक्षा अभियान व सर्वांसाठी मोफत शिक्षण अभियान अंतर्गत मुलींसाठी व बिपियल धारक मुलांसाठी आणि आदिवासी व बौद्ध समाजातील मुलांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले आ-हेत. या कार्यक्रमप्रसंगी ग्रा.पं.सदस्य दयाराम भोईर, शा. व्य.समितीचे अध्यक्ष विश्वनाथ थिटे, सदस्य विष्णू भोईर, स्रुष्टी सुटे, कावेरी बामणे मयुरा ठाकूर, सुप्रिया जाधव आदींसह विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

## ग्रुप ग्रामपंचायत तळेखार

**मु.तळखोर, पो.चोरढे, ता.मुरुड (जंजिरा), जि.रायगड**

### साहित्य पुरवठा दरपत्रक मागणी

ग्रुप ग्रामपंचायत तळेखारसाठी २०१६-२०१७ ते २०१७-२०१८ सालाकरिता चौदा वित्त आयोग योजनेंतर्गत खरेदी करावयाच्या साहित्यासाठी मान्यता प्राप्त पुरवठादाराकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पुरवठादारांनी दि.२२/०३/२०२२ पर्यंत सिलबंद लिफाफ्यात कार्यालयीन वेळेत दुपारी १२.०० ते २.०० ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावी.

**खरेदी करावयाचे साहित्य**

अटी व शर्ती :-

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | दरपत्रक मंजूर करावयाची | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंतिम तारीख | वेळ | ठिकाण |
| १ | शिवगाव शाळेला धान्य कोठा पुरविणे | १५०००/- | २२/०३/२२ | दुपारी १२.०० ते २.०० | ग्रामपंचायत कार्यालय तळेखार |

१) दर पत्रके मंजूर / नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले असून नामंजूर बाबत पत्र व्यवहार केला जाणार नाही.

२) दरपत्रके प्रक्रियेच्या नियम व अटी ग्रामपंचायत तळेखार येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

३) साहित्य उत्तम दर्जाचे असावे.

४) साहित्य पुरवठा बाबतचे दरपत्रक मंजूर झाल्यास करारनामा करावा लागेल.

५) पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

६) प्राप्त निविदा दि.२२/०३/२०२२ रोजी दुपारी ३.०० वा. ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय तळेखार येथे उपस्थितांच्या समक्ष मा.सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील.

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत तळेखार**
**ता.मुरुड, जि.रायगड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## राष्ट्रीय कीर्तनसप्ताहाची सांगता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त कै. मुग्धा लोंढे यांचे स्मरणार्थ आणि महिला दिनाचे औचित्य साधत नगरसेविका रुचिता लोंढे आणि परिवार यांच्या वतीने एका राष्ट्रीय कीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. पनवेल येथील विरूपाक्ष मंदिरात हा सप्ताह संपन्न झाला. याचे औपचारिक उद्घाटन आमदार प्रशांत ठाकुर यांचे हस्ते करण्यात आले. या सप्ताहात अनेक क्रांतिकारकांची चरित्रे सांगितली गेली.

या सप्ताहात रायगड कीर्तन संकूलातील अथर्व घाटे (पेण), अवनी गद्रे (पाली), श्रुती बोंद्रे (अलिबाग), सुखदा मुळ्ये-घाणेकर तर दर्शन वझे (पुणे), सायली मुळ्ये (रत्नागिरी), ज्योत्स्ना गाडगीळ (अंबरनाथ) या युवा पिढीतील कीर्तनकारांनी उत्तम रितीने क्रांतिकारकांची चरित्रे सांगून राष्ट्रीय धर्माचा जागर केला. नंदकुमार कर्वे यांनी संवादिनी तर गणेश घाणेकर, आदित्य उपाध्ये यानी तबलासाथ केली. कीर्तन सोहळा यशस्वी करण्यात गुरुनाथ लोंढे, चंद्रकांत मने, व किरण बापट यानी मोलाचे योगदान दिले. विशेष म्हणजे याच कीर्तनकारांनी नवीन पनवेल येथील आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके हायस्कूल मध्ये कीर्तनसप्ताह संपन्न केला. शालेय विद्यार्थ्यांच्या समोर स्वातंत्र्यापूर्व काळातील इतिहास जागा करण्याची संधी दिल्याबद्दल सर्वच कीर्तनकारांनी वैशंपायन यांचे विशेष आभार मानले. शालेय विद्यार्थ्यांचा प्रतिसाद उत्स्फूर्त होता. पुढील पिढी सक्षम नागरीक बनवण्याचं फार मोठं काम अशा कीर्तनांच्या माध्यमातून होत आहे असा कीर्तन परंपरेवरील विश्वास मानसी वैशंपायन यानी व्यक्त केला.

## जागतिक महिला दिन साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी आमदार दत्तूशेठ पाटील शिक्षण प्रसारक मंडळाचे न्यू इंग्लिश स्कूल नेरे येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती गायकवाड, वामन पाटील, सह शिक्षिका सरीता गायकर, अरूणा रूपवते, नेरे ग्रामपंचायत सदस्य सारीका यांनी केले होते. या कार्यक्रमाला मोहिते हॉस्पिटल पनवेलच्या डॉ. समिधा सुहास नटावदकर या प्रमुख पाहुण्या होत्या. त्यांनी महिलांना आरोग्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे जागतिक महिला दिनी शाळेने कर्तृत्ववान महिलांचा सत्कार तर केलाच पण घरामध्ये राबणार्या, घरकाम करणार्या स्त्रीचा देखील सत्कार करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती गायकवाड यांनी महिलांना मागदर्शन करताना म्हणाल्या की, आजची स्त्री ही कमजोर नाही, आजची स्त्री ही कणखर आहे. आपल्या घरापासून ते देशाच्या विकासामध्येही महिलांचे मोठे योगदान आहे. आज प्रत्येक क्षेत्रात प्रगती पथावर स्त्री आहे.

पण तरीही स्त्रियांना आत्मनिर्भर बनले पाहिजे आणि निर्भयपणे संकटांचा सामना केला पाहिजे, कारण पुढची पिढी कशी घडवायची हे महिलांच्याच हातात आहे. 'तुझ्या प्रयत्नांना मिळू दे यशाची सोनेरी किनार, लक्ष दिव्यांनी उजळू दे तुझा संसार, कर्तव्य आणि सामर्थ्याची ओढून ये नवी झालर..स्त्री शक्तीचा होऊ दे पुन्हा एकदा जागर...असे शेवटी त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका अरूणा रूपवते यांनी केले तर आभार प्रदर्शन सरीता गायकर यांनी केले.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे जाहीर सुचना देण्यात येते की, १) श्रीमती.अंजनी बारक्या पाटील २) श्री.भास्कर दगडू ठाकूर, ३) दिलीप दगडू ठाकूर, पत्ता : कोपरा गाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांना फाईल नं.२७१ येथील खारघर नोड, प्लॉट नं.१५ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला असून हस्तांतरण झाले आहे. तसेच वर नमूद शेतकऱ्यांकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल मेसर्स कृष्णा इंटरप्रायझेस तर्फे भागीदार १) श्री.राजेश हिरालाल नकुमपरमार २) श्री.हिरजी मनजी बारवडीया रा.शॉप नं.१५, सेक्टर २१, प्लॉट नं.८६, उलवे, नवी मुंबई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांनी ११४९.८५ चौ.मी. पैकी ५० टक्के अविभाज्य भाग त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल नं.२७१ खारघर नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | ३५ आय | १५ | ११४९.८५ चौ.मी. पैकी ५० टक्के अविभाज्य भाग |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

# भाजपाच्या घवघवीत यशाबद्दल तळा शहरात फटाके फोडून विजयी जल्लोष साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

उत्तर प्रदेश, उत्तराखंड, मणिपूर, गोवा या चार राज्यांतील विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीला घवघवीत यश संपादन झाले. भाजपाच्या या घवघवीत यशाबद्दल भाजपा तळा तालुक्याच्यावतीने तळा शहरात बळीचा नका येथे मोठ्या उत्साहात आनंदोत्सव साजरा करण्यात आला.



आज सकाळी (दि.११) तळा बाजारपेठ बळीचा नका येथे भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते एकत्र येत. भारतीय जनता पार्टीचा विजय असो, जय श्री राम, देश का नेता कैसा हो, नरेंद्र मोदी जैसा हो, देवेंद्रजी आप आगे बढो - हम तुम्हारे साथ है, उत्तर प्रदेश की यही पुकार फिर एक बार भाजपा सरकार उत्तर प्रदेश तो झांकी है महाराष्ट्र तो अभी बाकी है. अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या जल्लोषात हा विजय साजरा केला. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली तसेच प्रमुख नेत्यांनी साखर-पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला यावेळी भाजपा महाराष्ट्र सचिव रविभाऊ मुंढे, तळा तालुका भाजपा अध्यक्ष ॲड. निलेश रातवडकर, रायगड जिल्हा महिला अध्यक्षा हेमा मानकर, शहर अध्यक्ष सुधीर तळकर, माजी नगराध्यक्षा सौ.रेश्मा मुंढे, नगरसेविका दिव्या रातवडकर, नगरसेवक रितेश मुंढे हर्षद ठक्कर आदी मान्यवर उपस्थित होते.

चार राज्यात मिळालेला विजय हा विकासाचा विजय रविभाऊ मुंढे. भारतीय जनता पार्टी कायम विकासाचे राजकारण करत असून केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना घरा घरात पोचुन त्याचा सर्व सामान्य नागरिकांना फायदा झाला म्हणूनच भारतीय जनता पार्टीला व्यापक पाठिंबा मिळत आहे त्याचे चित्र आज चार राज्यात पक्षाला मिळालेल्या घवघवीत यशाने आज स्पष्ट होत आहे.माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असलेला विश्वास या निकलांमधून दिसतो महाराष्ट्रात देखील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली लवकरच भाजपाचे सरकार स्थापन होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

नवऱ्याजवळ पटत नाही म्हणुन तीन महिने वडिलांचे घरी माहेरी वास्तव्यास गेलेली असताना २४ वर्षाचे विवाहित महिला प्रणाली निलेश नाक्ती,रा खरसई हिने ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या करण्याची घटना म्हसळा तालुक्यातील मेंदडी गणेशनगर येथे दिनांक १० मार्च २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजताचे दरम्यान घडली. घटनेची फिर्याद मयताचे वडील गोपाळ अर्जुन पाटील वय ४५ वर्षे,रा.मेंदडी गणेशनगर यांनी म्हसळा पोलीस ठाण्यात दिली असता पोलिसांनी आकस्मात मृत्यू रजी नंबर ०३/२२,सिआरपीसी १७४ प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

इंदलकर साहेब यांचे कोर्ट
ॲड.दिनानाथ के. सोनकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज कनिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.२४०/२०२२
ने.ता.१३/०४/२०२२

श्री.मुरजी भुरा वावीया — अर्जदार
विरुद्ध
पनवेल शहर महानगरपालिका
सह निबंधक जन्म व मृत्यू विभाग
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — सामनेवाला

अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणे करिता पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज कनिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात फौजदारी चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची मुलगी कु.खुशी मुरजी वाविया यांचा दि.०३/०९/२०२० रोजी ओझा हॉस्पिटल पनवेल येथे जन्म झाला आहे. अर्जदार यांनी त्यांची मुलगी कु.खुशी मुरजी वाविया यांच्या जन्माची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.पनवेल यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कु.खुशी मुरजी वाविया ह्या वरील तारखेस व ठिकाणी जन्म झाल्या आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर ''दैनिक रायगड नगरी'' या जाहीर नोटीसीच्या तारखेच्या १ महिन्याच्या आत त्याने या मे.न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.०९ मार्च २०२२ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

मा.श्री.मुजावर सो
श्री.राजेश बांगर, पनवेल
अर्जदाराचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१७८/२०२२
नि.नं.८/ड

श्री.जयेंद्र मधुकर पाटील
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती व व्यापार
रा.सोमटणे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी कै.यमुना उर्फ यमुनाबाई मारुती पाटील यांचे दि.०२/०४/२०१४ रोजीचे अंतिम मृत्यूपत्राप्रमाणे मिळणाऱ्या खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात अर्जदार यांनी सदरचे प्रोबेट दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

कै.यमुना उर्फ यमुनाबाई मारुती पाटील यांचे मालकीच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**अ) गांव : दहिवली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**येथील जमीन मिळकती खालीलप्रमाणे :-**

| अनुक्रमांक | सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १ | १०/३ | ०-४२-७० | ७.४४ |
| २ | २१/१ | ०-४६-० | ९.६३ |
| ३ | ५०/१ | ०-१०-१० | ०.८७ |
| ४ | ५०/५ | ०-१०-६० | ०.६९ |
| ५ | ४४/० | ०-३३-०० | ०.७२ |
| ६ | ५७/२ | ०-२०-५० | ३.९४ |

कै.यमुना उर्फ यमुनाबाई मारुती पाटील यांच्या मृत्यूपश्चात नमूद मिळकतीपैकी अनुक्रमांक ५ व ६ सर्व्हे नं.४४, हिस्सा नं.० व सर्व्हे नं.५०, हिस्सा नं.५ या मिळकतीबाबत कै.यमुना मारुती पाटील यांनी त्यांचे हिश्श्यापुरते खरेदीखत रद्द करून मिळणेरिता मा.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात रे.मु.क्र.४१४/२०१३ दाखल केलेला आहे. व अनु क्र.६ सर्व्हे नं.५७, हिस्सा नं.२ या मिळकतीबाबत दिवाणी दावा क्र.७७/२०१४ दाखल केलेला आहे. मा.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश यांचे कोर्टातील रे.मु.क्रं.४१४/२०१३ व रे.मु.क्र.७७/२०१४ चे कामी होणाऱ्या न्यायनिर्णयाप्रमाणे मिळणारे सर्व फायदे

वर अर्जदार ह्यांनी कै.यमुना उर्फ यमुनाबाई मारुती पाटील यांचे दि.०२/०४/२०१४ रोजीचे अंतिम मृत्यूपत्रान्वये मिळणाऱ्या स्थावर मिळकतीबाबत कोणतीही हरकत असल्यास व ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.जयेंद्र मधुकर पाटील यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.यमुना उर्फ यमुनाबाई मारुती पाटील यांचे पश्चात प्रोबेट दाखला मिळण्यास पात्र आहेत, असे सिद्ध झाल्यास त्यांना हे प्रोबेट दाखला मंजूर करेल.

आज दि.१०/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : आसरोटी, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेल्या जमीन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : आसरोटी, ता.खालापूर, जि.रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्रीमती.लिलादेवी जगदीशप्रसाद जाखोटीया २) श्रीमती.शोभा जयवंत राणे | ७९ | ० | ०२.०२.६० पो.ख.०.७१.६० एकूण क्षेत्र २.७४.२० त्यापैकी ०.४०.०० एवढ्या क्षेत्राबाबत | ११.५० |

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लीज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी नोंदवावी.

वरील विहित मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न प्राप्त झाल्यास नोटीसीत नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व व बोजारहीत आहे व मिळकतीचे मालकांचे मालकी व वहिवाटी हक्कासंबंधात कोणताही वाद नाही असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

दि.११/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.सागर का.कोंडीलकर**
**ऑफिस नं.२१, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, पनवेल**
**वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, ता.पनवेल, जि.रायगड**

### सहनिबंधक सहकारी संस्था (सिडको) यांचे कार्यालयात

शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित
बेलापूर स्टेशन रेल्वे कॉम्प्लेक्स, टॉवर नं.०८, पाचवा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
फोन नं.(०२२ ६७१२१०२५/२७५७४५०५)

जा.क्र.सनि/ससं/सिडको/३१८८/२०२२ — दिनांक:११/०३/२०२२

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११ (२) व नियम (२) अन्वये

### जाहीर नोटीस

चेअरमन/सेक्रेटरी
कामोठे शांती सागर को.ऑप.हौ.सो.लि.,
भूखंड क्र.५३, सेक्टर ११, कामोठे, नवी मुंबई — अर्जदार
विरुद्ध
१) मेसर्स सैनिक कन्स्ट्रक्शन्स तर्फे भागीदार
श्री.आरिफ कासम अली शेख
श्री.सुर्यकांत विश्वास भोईटे
पत्ता :९३, मर्क्युरी अपार्ट., सेक्टर ०६, ऐरोली, नवी मुंबई
२) श्रीमती.यमुनाबाई गणू पाटील
३) श्री.सखाराम बंडू म्हात्रे
४) श्री.तुळशीराम बंडू म्हात्रे
५) श्री.शांताराम बंडू म्हात्रे
६) श्रीमती.शेवंताबाई सखाराम म्हात्रे
७) श्रीमती.सिताबाई तुळशीराम म्हात्रे
पत्ता : मु.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
८) मा.व्यवस्थापक (शहर सेवा) २, साट्यो,
सिडको लि., सिडको भवन, पहिला मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई — जाब देणार

कामोठे शांती सागर को.ऑप.हौ.सो.लि.भूखंड क्रं.५३, सेक्टर ११, कामोठे, नवी मुंबई या संस्थेचा दिनांक २९/१२/२०२१ रोजी या कार्यालयात प्राप्त झालेला अर्ज

१) अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपूर्वी द्यावी.

२) जाब देणार यांनी त्यांच्या बचावासाठी व्यक्तीशः त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीमार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपूर्वी लेखी उत्तर सादर करावे.

३) आपणाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर विचारात घेवून प्रकरणातील सुनावणी दि.२२/०३/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता निश्चित करण्यात येत आहे.

४) आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही, तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

५) आपणास सुनावणीचे वेळी पूर्वी १० मिनिटे अगोदर प्रवेश दिला जाईल. सुनावणी वेळेनंतर प्रवेश दिला जाणार नाही व सुनावणीस आपण गैरहजर आहात असे गृहीत धरण्यात येईल.

६) सुनावणीच्या वेळी एका पक्षकाराच्या वतीने जास्तीत जास्त दोन व्यक्तींना प्रवेश दिला जाईल.

७) सुनावणीचे वेळी लहान मुलांना सोबत आणू नये, कोणत्याही परिस्थितीत लहान मुलांना प्रवेश दिला जाणार नाही.

८) आपणास जे काही लेखी म्हणणे मांडावयाचे आहे ते आपण पीडीएफ (PDF) फॉर्ममध्ये स्वस्वाक्षरीसह या कार्यालयाचे JTRCIDCOHEAR@gmail.com या ईमेलवर सुनावणी दिनांकापूर्वी कमीत कमी एक दिवस अगोदर पाठवावे.

९) सुनावणीस येताना प्रत्येक व्यक्तींनी मास्क घालणे बंधनकारक राहील. विना मास्क प्रवेश दिला जाणार नाही.

१०) प्रवेश द्वारावर सॅनिटायझर उपलब्ध करून दिलेले आहे. त्याचा वापर करून प्रवेश दिला जाईल. तसेच प्रत्येक व्यक्तीच्या शरीराचे तापमान तपासले जाईल. ज्या व्यक्तीचे तापमान नियमित तापमानापोक्षा जास्त असेल त्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

**सही/-**
**(डॉ.केदारी जाधव)**
**सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई**

मे.मुजावर यांचे न्यायालयात
ॲड.बेलापूरकर व ॲड.नरेंद्र बाबरे
अर्जदाराचे वकील

### जाहीर नोटीस समन्स

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११२९/२०२१
नि.नं.१६/ड
नि.नं.२०/०४/२०२२

बी.एस.एन.एल.ऑफिसर्स को.ऑप.हौसिंग सोसायटी (प्रपोज्ड), पुणे
ऑफिस-बी.एस.एन.एल., आर.टी.टो.सी.कॅपस,
चिंचवड एम.आय.डी.सी.एरिया,
जी ब्लॉक, प्लॉट नं.१२१, १२२, पुणे-४११०१९
ऑफिस-ए-१२, संचार क्वॉटर्स, एम.टी.एन.एल. मार्ग,
प्रभादेवी, दादर (वेस्ट), मुंबई-४०००२८
सदर संस्थेचे सभासद
१) श्री.महादेव सदशिव अडसुळ व इतर — वादी/अर्जदार
विरुद्ध
१) मे.श्रेयश इन्फाप्रोजेक्टस ॲण्ड बिल्डर्स प्रा.लि.
ऑ.४१०, ४११, ४१२ द लॅन्डमार्क, प्लॉट नं.२६ अ,
सेक्टर-७, खारघर, नवी मुंबई-४१०२१०
२) श्री.संभाजी सकपाळ
चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर,
मे.श्रेयश इन्फाप्रोजेक्टस ॲण्ड बिल्डर्स प्रा.लि.
ऑ.४१०, ४११, ४१२ द लॅन्डमार्क,
प्लॉट नं.२६ अ, सेक्टर-७, खारघर,
नवी मुंबई-४१०२१० आणि इतर — प्रतिवादी/जाब देणार

वरील अर्जदार/वादी यांनी वर नमूद प्रतिवादी यांचे विरोधात सद-रचा अर्ज दाखल केलेला असून वर नमूद प्रतिवादी क्र.१ व २ यांचे अथवा कोणाचेही कोणत्याही प्रकारची हरकत म्हणणे वगैरे असल्यास त्याने स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत तशी हरकत ही सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत घेणे आवश्यक आहे व तसेच वर नमूद प्रमाणे प्रतिवादी क्र.१ व २ हे पुढील तारखेस मे.कोर्टात हजर न झाल्यास व नमुद अर्जात आपले म्हणणे मे.न्यायालयात दाखल न कोल्यास व वरील अर्जास मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे गृहीत धरुन मे.कोर्ट अर्जदार यांचा अर्ज निकाली काढेल व मुदतीनंतर आलेल्या म्हणण्याचा हरकतींचा विचार केला जाणार नाही.

सदर अर्जाची पुढील तारीख ही २० एप्रिल २०२२ ही नेमलेली आहे.

आज दि.११/०३/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गोडसे सो
ॲड.हर्षदा सुनील गडकर
अर्जदारतर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२८९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२६/०४/२०२२

१) श्रीमती.लिला मोहनलाल सचदेव
रा.फ्लॅट नं.११, १ ला मजला, सद्गुरु प्रसन्न,
डॉ.आंबेडकर रोड, नवीन भाजी मार्केट समोर,
प्लॉट नं.२०१, पनवेल, रायगड, महाराष्ट्र-४१०२०६
२) सौ.सरोज सुरेशकुमार मखीजानी
रा.फ्लॅट नं.१८, ए विंग, आनंद नगर सोसायटी,
शिवाजी रोड, जुने पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६
३) सौ.साक्षी राम नारंग
रा.गायत्री निवास, सेन १०५ (१),
लोणकर हॉस्पिटल समोर, वीर सावरकर चौक,
दौंड, पुणे, महाराष्ट्र-४१३८०१
४) सौ.गीता संजय फुलवानी
रा.हरी-धरा बंगला नं.१६/५२४, बुशरा पार्क,
पनवेल, रायगड, महाराष्ट्र-४१०२०६
५) सौ.जया प्रशांत कल्याणकर
रा.रुम नं.३०१, बिल्डींग नं.आर-३, मोराज कन्सेप्ट,
तक्का कॉलनी, पनवेल, रायगड, महाराष्ट्र-४१०२०६
६) वर्षा मोहनलाल सचदेव
रा.फ्लॅट नं.११, १ ला मजला, सद्गुरु प्रसन्न,
डॉ.आंबेडकर रोड, नवीन भाजी मार्केट समोर,
प्लॉट नं.२०१, पनवेल, रायगड, महाराष्ट्र-४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

१) या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ही कै.मोहनलाल खेराजमल सचदेव यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ ते ६ ह्या मुली आहेत.

२) कै.मोहनलाल खेराजमल सचदेव हे दि.१२/०३/२०२१ रोजी मौजे : पॅनसिया हॉस्पिटल, नवीन पनवेल, महाराष्ट्र येथे मयत झालेले असून कै.मोहनलाल खेराजमल सचदेव यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. तसेच अर्जदारांव्यतिरिक्त कै.मोहनलाल खेराजमल सचदेव यांस आणखीन कोणीही वारसदार नव्हते व नाहीत.

३) कै.मोहनलाल खेराजमल सचदेव यांची पनवेल शहर महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड येथील खुद्द मालकीची व नावे असलेली प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णनाची जमीन मिळकत तसेच त्यावरील बांधलेल्या सद्गुरु प्रसन्न बिल्डींग मधील १ फ्लॅट व ३ वाणिज्य गाळे होते व आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

अ) मौजे : पनवेल येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन भाजी मार्केट समोर, डॉ.आंबेडकर रोड येथील फायनल प्लॉट नं.२०१/१ जमीन मिळकत एकूण क्षेत्रफळ अंदाजे ६०९.८ चौ.मीटर पैकी एकूण क्षेत्रफळ १७७.२३ चौ.मीटर इतकी जमीन मिळकत, गाव-पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६

ब) मौजे : पनवेल येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन भाजी मार्केट समोरील फायनल प्लॉट नं.२०१/१ (क्षेत्र ६०९.८ चौ.मीटर) वरील ''सद्गुरु प्रसन्न'' बिल्डींग मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.११ क्षेत्र ५६० चौ.फुट कारपेट एरिया (५२.०२ चौ.मीटर क्षेत्र कारपेट एरिया) ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६

क) मौजे : पनवेल येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन भाजी मार्केट समोरील फायनल प्लॉट नं.२०१/१ (क्षेत्र ६०९.८ चौ.मीटर) वरील ''सद्गुरु प्रसन्न'' बिल्डींग मधील तळ मजल्यावरील दुकान नं.७ क्षेत्र २१६ चौ.फुट कारपेट एरिया (२०.०६ चौ.मीटर क्षेत्र कारपेट एरिया) ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६

ड) मौजे : पनवेल येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन भाजी मार्केट समोरील फायनल प्लॉट नं.२०१/१ (क्षेत्र ६०९.८ चौ.मीटर) वरील ''सद्गुरु प्रसन्न'' बिल्डींग मधील तळ मजल्यावरील दुकान नं.८ क्षेत्र १७५.५ चौ.फुट कारपेट एरिया (१६.३० चौ.मीटर क्षेत्र कारपेट एरिया) ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६

इ) मौजे : पनवेल येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन भाजी मार्केट समोरील फायनल प्लॉट नं.२०१/१ (क्षेत्र ६०९.८ चौ.मीटर) वरील ''सद्गुरु प्रसन्न'' बिल्डींग मधील तळ मजल्यावरील दुकान नं.९ क्षेत्र १७० चौ.फुट कारपेट एरिया (१५.७९ चौ.मीटर क्षेत्र कारपेट एरिया) ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६

४) कै.मोहनलाल खेराजमल सचदेव यांची वर कलम ३ अ,ब,क,ड आणि इ मधील नमूद खुद्द मालकीची व नावे असलेली प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकतीतील आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांनी तसा वारस दाखला मिळण्याकरिता दिवाणी चौकशी अर्ज क्र.२८९/२०२२ पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत अर्जदार हे कै.मोहनलाल खेराजमल सचदेव यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर राहून लेखी हरकत स्वतः अगर वकीलांमार्फत सादर करावी.

वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे लाभांत अर्जदारांच्या नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

आज तारीख ०९/०३/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# पालीतील सरसगडाची होरपळ ; वनसंपदा जळून खाक प्राण्यांचा अधिवास नष्ट

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पालीतील प्राचीन सरसगड किल्ल्यावर महिनाभरात तब्बल ६ मोठे मानवनिर्मित वणवे लागले आहेत. या वणव्यामुळे किल्ल्याचा बहुतांश सर्वच भाग जळून होरपळला आहे. यामध्ये किल्ल्यावर नव्याने लावलेले रोपे व संवर्धन केलेली झाडे जळून खाक झाली. शिवाय येथील माकडे, वानरे व पक्ष्यांच्या अन्नाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच त्यांचा अधिवास देखील नष्ट झाला.

स्थानिक नागरिक व वन विभागाचे कर्मचाऱ्यांनी वणवा विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. यामुळे किमान मानवी वस्तीत आग आली नाही. वारंवार लागणाऱ्या वनव्यांमुळे किल्ल्याची प्रचंड प्रमाणात हानी होत आहे. पालीतील



नागरिकांना देखील याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत.

नैसर्गिक व कृत्रिम वणव्यांमुळे सरसगडावरील जैवविविधता व सजीव सृष्टी धोक्यात येत आहे. तसेच प्रदुषण वाढते आहे. पालीकरांना तापमान वाढीला सामोरे जावे लागत आहे. किल्ल्यावरील सरटणारे जीव, (घोरपड, साप, सरडे, विंचु इत्यादी) किटक आणि झाडे-झुडपे, वनस्पती आगीमध्ये भस्मसात झाले. विवीध प्राण्यांचे व पक्षांचे आसरे-निवारे संपुष्टात आले. त्यांची पिल्ले देखिल या आगीत होरपळून मेली.

वनव्यांमुळे किल्ल्यावरील ऐतिहासिक ठेव्यांचे बांधकाम कमकुवत होऊन ते ढासळण्याच्या स्थितीत आहेत. किल्याच्या तटबंदीवर, बुरुजांवर उगवलेले गवत जळाल्यामुळे त्यांचे नुकसान झाले.

शिवाजी महाराजांनी या गडाचे महत्व ओळखून गडास स्वराज्यात दाखल करुन घेतले. आणि सरसगडाच्या दुरुस्तीसाठी दोन हजार होण मंजुर केल्या होत्या. या नुसार दुर्गमता व विपूल जलसंचय यावर विशेष भर देवून गडाची बांधणी करण्यात आली. दुरवर टेहाळणी करण्यास व इशारा देण्यास सरस म्हणून किल्ल्यास सरसगड नाव देण्यात आले.

किल्ल्यावर घोड्याची पागा, धान्य कोठारे, शस्त्रागारे, कैदखाने, दारू कोठारे व देवळ्या खोदून बांधण्यात आली आहेत. बैठकिच्या खोल्या बांधण्यात आल्या असून यामध्ये शिबंदी राहत असे. तोफा व बंदूकांचा वापर करण्यासाठी बुरुज व तटास अनेक छिद्रे (जंग्या) ठेवण्यात आली आहेत. बालेकिल्ल्यावर केदारेश्वर मंदिर व त्याभोवती तळे आहे. तसेच शहापिर दर्गा अहे.

## संक्षिप्त...

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये उडाण़ महोत्सवाचे अत्यंतिक योगदान : अॅड.साबळे

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

डीजीटी महाविद्यालय, माणगांव जि.रायगड आणि मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार कार्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माणगांवच्या डीजीटी महाविद्यालयामध्ये दिनांक ८ मार्च २०२२ ते १० मार्च २०२२ रोजी उडाऩ स्पर्धा महोत्सव २०२१-२०२२ ऑनलाइन पद्धतीने संपन्न झाल्या . या स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्यातील एकूण १८ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धा, पथनाट्य स्पर्धा, पोस्टर मेकिंग स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा, पोवाडा स्पर्धा यांचे सादरीकरण केले. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. राजीव साबळे, मुंबई विद्यापीठ डीएलएलई विभागाचे प्रमुख डॉ. कुणाल जाधव , रायगड भूषण पुरस्कार प्राप्त पत्रकार श्री. रविंद्र कुवेसकर , प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर, प्रा. आकांशा गावडे ठाणे जिल्हा समन्वयक , प्रा. विनोद इंदुलकर , प्रा.देविदास शिवपुजे , डॉ राजेंद्र आचार्य उपस्थित होते .

याप्रसंगी ड. राजीव साबळे यांनी प्रारंभी सहभागी स्पर्धकांचे हार्दिक स्वागत केले व पुढे ते म्हणाले की,मुंबई विद्यापीठाच्या उडाऩ महोत्सवा सारख्या रचनात्मक कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास फार मदत होते आणि त्यातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये काम करण्याची संधी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आणि महाविद्यालयाचाही नावलौकिक वाढतो. मुंबई विद्यापीठाच्या वतीने प्रमुख परीक्षक म्हणून रायगडभूषण पुरस्कार विजेते रविंद्र कुवेसकर म्हणाले की, कोव्हिड १९ च्या भीषण टाळेबंदीनंतर होणाऱ्या या स्पर्धेमुळे महाविद्यालयात आणि विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य सळसळत आहे. म्हणून या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला आहे. हे चित्र फार चैतन्यदायी आणि उत्साहवर्धक आहे, असा आशावाद व्यक्त करून सर्व सहभागी स्पर्धकांना त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या तीन दिवसिय कार्यक्रमाचे यशस्वी नेतृत्व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एम. खामकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डीएलएलई विभागप्रमुख प्रा. भानुप्रसाद विश्वकर्मा , प्रा. तमसील शहाजहान, प्रा. जाफर फिरदौस, प्रा. सबरीन लोखंडे, प्रा. पांडे जे. आर., प्रा. अमरीन आडकर या प्राध्यापक वृंदानी आणि कीर्ती कदम, दिव्या शिंदे, सानिया तार्लेकर, साक्षी कांबळे, काजल वाढवळ या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## माथेरान मध्ये पर्यटन वृद्धिंगत कामी शुटिंगचे प्रमाण वाढण्यासाठी प्रयत्न करणार : मनोज खेडकर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान हे रायगड जिल्ह्यातील एक जागतिक दर्जाचे अतिशय सुंदर पर्यटनस्थळ असून इथे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सिनेमा त्याचप्रमाणे सिरीयलच्या शूटिंगचे प्रमाण वाढल्यास नक्कीच याठिकाणी पर्यटकांची संख्या वाढून याच माध्यमातून सर्वसामान्य लोकांना, दुकानदार, व्यावसायिक,कष्टकऱ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात याकामी आम्ही निश्चितपणे आगामी काळात प्रयत्न करणार आहोत असे काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष तथा शहर काँग्रेस अध्यक्ष मनोज खेडकर यांनी सांगितले आहे.

सध्या माथेरान नगरीत जेष्ठ अभिनेते राज बब्बर, अतुल कुलकर्णी , आयेशा जुलका या लोकप्रिय सिनेस्टार्सच्या वेब सिरीजचे शूटिंग सध्या निसर्गरम्य



माथेरानला सुरू आहे हे शूट ऍमेझॉनच्या चॅनेल वर दाखवली जाणार आहे या लोकप्रिय कलाकारांमुळे माथेरानच्या पर्यटनाला नक्कीच गती मिळणार आहे.

राज बब्बर हे काँग्रेस पक्षाचे माजी खासदार असल्याने काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मनोज खेडकर, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे,सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे यांनी भेट घेतली व येथे शूटिंग करणे फारच त्रासदायक असताना देखील माथेरानची निवड केल्याबद्दल सर्वांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

ट्रेन च्या शूटिंग साठी त्यांनी १० मार्च ची तारीख रेल्वे कडे मागितली होती काही कारणास्तव १० च्या ऐवजी ११ ला शूट करायचे होते या साठी आवश्यक कागदपत्रे वेळेत पोहचू न शकल्याने शूट रद्द होण्याच्या भीतीने राज बब्बर यांची पूर्ण टीम टेन्शन मध्ये होती माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी रेल्वेच्या जनसंपर्क अधिकारी शिव-ाजी सुतार यांच्या सोबत संपर्क साधला व तांत्रिक अडचण दूर करून दिली ह्या शूट मुळे माथेरानच्या पर्यटनात वाढ होऊ शकते असा विश्वास व्यक्त केला.

## काकडशेत ग्रामपंचायत सरपंच नीना खेडेकर यांचा अनोखा उपक्रम

**दै.रायगड नगरी । तळा**

ग्रुप ग्रामपंचायत काकडशेतने १५ वित्त आयोगाच्या माध्यमातून ग्रामपंचायत हद्दीतील गौळवाडी, कळसांबडे, अडनाळे तथा काकडशेत शाळेला सौरपॅनल दिले. आणि शाळेच्या व्यवसायिक वीजबिल आकाराच्या समस्येची दखल घेतली. सरपंच नीना खेडेकर, उपसरपंच सौ.अर्चना तापकीर ग्रामसेवक उमाजी माडेकर तथा समस्त ग्रामपंचायत सदस्यांनी या कामासाठी पाठ पुरावा केला विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी केलेल्या या उपक्रमासाठी सर्व स्तरावर सरपंच नीना खेडेकर यांचे कौतुक होत आहे. सौरपॅनलचा उदघाटन तथा लोकार्पन सोहळा दि.९/३/२०२२ रोजी राजिप शाळा. कळसांबडे येथे पार पडला. मर्यादित क्षेत्रातील अमर्याद कामाबद्दल मुख्याध्यापिका सौ.उल्का उमाजी माडेकर यांनी आभार मानले. कळसांबडे शाळेतील दर शनिवारी राबवली जाणारी धावती सफाई व कचरा संकलन स्वच्छ भारत आभियान या पुरक उपक्रमाच्या समन्वयक हर्षाली रकीबे/काळे यांचे ग्रामपंचायती मार्फत कौतुक करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य सौ.लक्ष्मी दिवेकर शिंदे, मंगेश काप, वंदना केळकर, संदीप जामकर विस्तार अधिकारी तळा शिक्षण विभाग.तथा कळसांबडे ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष राजेश मोरे आणि समस्त शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते..

## श्रीवर्धन तालुक्यात आंबा, काजू ,नारळ, सुपारी, फणस, कोकम या पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

३ जून २०२० रोजी श्रीवर्धन व हरिहरेश्वर समुद्र किनाऱ्याला निसर्ग चक्रीवादळाने अक्षरशः झोडपून काढले होते.नव्वद टक्के घरांवरील छप्पर उडुन गेल्यामुळे नागरिकांना बेघर होण्याची वेळ आली होती. फक्त दोन ते अडीच तास झालेल्या चक्रीवादळा मध्ये श्रीवर्धन तालुक्यातील बहुतांश फळझाडे नष्ट झाली आहेत. जी नारळ, सुपारी, आंबा, फणस, काजू,कोकम यांची झाडे उभी आहेत ती सुद्धा घाबरलेली असल्याने, त्यांची फलोत्पादन क्षमता कमी झाल्याचे पाहायला मिळत आहे. अनेक बागायतदारांनी झाडांची नवीन लागवड केलेली असली तरीही अजून झाडे उत्प-ादन देण्यासाठी सात ते आठ वर्षांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे वादळानंतर उध्वस्त झा-लेला बागायतदार पुन्हा उभा राहण्यासाठी कमीत कमी दहा वर्षाचा कालावधी लागेल हे भाकीत खरे ठरल्याचे दिसत आहे. चक्रीवादळा नंतर राज्यातील महा विकास आघाडी सरकारच्या मंत्र्यांनी, त्याचप्रमाणे श्रीवर्धनच्या आमदार व पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे,राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी श्रीवर्धन तालुक्यात अनेक बैठका घेऊन मदत जाहीर केली. परंतु शेतकऱ्यांना झाडांच्या नुकसानीची जी मदत मिळाली आहे ती अत्यंत तुटपुंजी आहे, असे म्हणावे लागेल. मागील वर्षी वटपौर्णिमेच्या दिवशी देखील श्रीवर्धन बाजारपेठेत एकही फणस विकायला आलेला पाहायला मिळाला नाही.

त्याचप्रमाणे वादळात कोकमाची झाडे नष्ट झाल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यात मोठ्या प्रमाणावर मिळणारे कोकम सरबत, कोकम आगळ, त्याचप्रमाणे आमसुले याचे उत्पादन देखील जवळ जवळ नाहीच असे म्हणावे लागेल. निसर्ग चक्रीवादळा नंतर नारळ किंवा सुपारी किंवा फणस यांची झाडे उत्पादन देण्यासाठी खूप वेळ लागेल म्हणून शेतकऱ्यांनी तातडीने पीक देणाऱ्या केळ्यांच्या झाडांची लागवड मोठ्या प्रमाणात केली होती. परंतु मागील वर्षी मे महिन्याच्या १६ व १७ तारखेला आलेल्या तोक्ते चक्रीवादळामुळे लावलेली केळीची झाडे देखील पूर्णपणे जमीनदोस्त झाली आहेत.या चक्रीवादळा नंतर बागायतदारांना शासनाने मदत देण्याचे आश्वासन दिले होते. मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी श्रीवर्धन तहसीलदार कार्यालयात बैठक घेऊन मदत देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. पण प्रत्यक्षात बागायतदारांना वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या.

फणस पोळी तयार करण्यासाठी बरका या जातीचा फणस उपलब्ध असावा लागतो. या फणसाचे गरे अतिशय मऊ व रसाळ असतात. याच फणसाच्या गऱ्यांचा रस काढून फणस पोळी बनवली जाते. परंतु बरक्या फणसाची झाडे देखील पूर्णपणे नष्ट झाल्यामुळे फणस पोळीचे उत्पादन देखील या ठिकाणी घेणे कठीण झाले आहे. निसर्ग चक्रीवादळा मध्ये सर्वात जास्त नुकसान श्रीवर्धन शहर त्याचप्रमाणे हरिहरेश्वर परिसर या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर झाले. त्यातच दोन वर्ष कोरोना महामारी मुळे फुकट गेल्यामुळे बागायतदार पूर्णपणे आर्थिक विवंचनेत सापडलेला पाहायला मिळत आह. श्रीवर्धन तालुक्यात फलोत्पादन व तत्सम पदार्थां मध्ये झालेली घट भरून निघण्यासाठी पुढील सात ते आठ वर्षे लागणार असून एके काळी नारळ-सुपारी त्याचप्रमाणे फलोत्पादनासाठी प्रसिद्ध असलेला श्रीवर्धन तालुका सध्या तरी दुष्काळी परिस्थितीत असल्याचे पाहायला मिळत आहे.


## ग्रुप ग्रामपंचायत तळेखार

**मु.तळखोर, पो.चोरढे, ता.मुरुड (जंजिरा), जि.रायगड**

### अल्प मुदतीची निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत तळेखार करिता १४ वित्त आयोग सन २०१९/२०२०-२०२०/२०२१ अंतर्गत खालील कामाकरिता इच्छुक ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागवत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा सादर करण्याची | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | फॉर्म मिळण्याची तारीख व वेळ | निविदा स्वीकारण्याची तारीख | वेळ दुपारी | सुरक्षा अनामत रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
| १ | शिवगाव येथील शौचालय दुरुस्ती करणे | ९९२५२/- | ३१ मार्च २०२२ | २२/०३/२२ वेळ सकाळी १० ते ११ | २२/०३/२२ | १२.०० ते २.०० वाजेपर्यंत | ४९६३/- | ९९२/- | १००/- |
| २ | तळे-बौद्धवाडी विहिरीला कंपाऊंड घालणे | २९९९५/- | ३१ मार्च २०२२ | २२/०३/२२ वेळ सकाळी १० ते ११ | २२/०३/२२ | १२.०० ते २.०० वाजेपर्यंत | १५००/- | ३००/- | १००/- |

अटी व शर्ती :-

१) कामाचे अंदाज पत्रक या कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात पहायला मिळतील. आवश्यक असल्यास फी भरुन त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.

२) निविदा व इसारा रक्कम स्वीकारण्याचा दिनांक २२/०३/२०२२ रोजी दुपारी १२.०० ते २.०० या वेळेत घेण्यात येतील.

३) प्राप्त निविदा दिनांक २२/०३/२०२२ रोजी दुपारी ३.०० वा.ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय तळेखार येथे उपस्थितांच्या सक्षम मा.सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील. रक्कम ग्रामपंचायतीकडून तरतुदीनुसार अदा करण्यात येईल.

४) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्ट्रेशनचे दाखल सत्य प्रत केलेले असावेत व प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा भरण्यात यावी.

५) कोणतेही एक किंवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच ग्रुप ग्रामपंचायत तळेखार यांनी राखून ठेवला आहे.

६) प्रत्येक देयकातून शासन निर्णयाप्रमाणे रक्कमा वजता केल्या जातील व मा.गटविकास अधिकारी सो. पंचायत समिती मुरुड यांजकडील तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली सदर कामे करावयाचे असून काम समाधानकारक नसेल तर ते काम त्याच स्थितीत थांबवून कार्यरंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

७) काम अंतिमरित्या पूर्ण झाल्यानंतर एक वर्षापर्यंत देखभाल दुरुस्ती संबंधित ठेकेदाराने करावयाचे असून, नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.

८) सविस्तर अटी व शर्ती करिता ग्रामपंचायत कार्यालयाकडे संपर्क साधावा.

९) निविदा उघडण्याच्या वेळेस ग्रा.पं.मध्ये फक्त ठेकेदारांनाच घेतले जातील.

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत तळेखार**
**ता.मुरुड, जि.रायगड**



## ग्रामपंचायत वहाळ

**मु.पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड**

### जाहीर निविदा नोटीस

वहाळ ग्रामपंचायत हद्दीतील खालील विकास कामे करण्याकरिता विहित मुदतीमध्ये नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद पाकिटात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा फॉर्म स्वीकारण्याची अंतिम मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | साईनगर वहाळ येथील गटार सफाई व निर्जतुकीकरण करणे | १६४९८९/- | १६४९/- | १००/- | दि.१२/०३/२०२२ ते १७/०३/२०२२ | दिनांक १९/०३/२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| २ | वहाळ स्मशानभूमी नाळ सफाई व निर्जतुकीकरण करणे | २४७४८४/- | २४७४/- | १००/- | दि.१२/०३/२०२२ ते १७/०३/२०२२ | |
| ३ | वहाळ गाव तलाव येथे तराफा बसविणे | १७००००/- | १७००/- | १००/- | दि.१२/०३/२०२२ ते १७/०३/२०२२ | |
| ४ | वहाळ गावातील अंतर्गत गटार सफाई व निर्जतुकीकरण करणे | २०६२३७/- | २०६२/- | १००/- | दि.१२/०३/२०२२ ते १७/०३/२०२२ | |
| ५ | एकायन हॉस्पिटल ते रमण शेठ घरत मैदान पर्यंतचा नाला सफाई व निर्जतुकीकरण करणे | २९६४३१/- | २९६४/- | १००/- | दि.१२/०३/२०२२ ते १७/०३/२०२२ | |
| ६ | वहाळ गाव तलाव गाळ काढणे, साफसफाई करणे | २९८४६२/- | २९८४/- | १००/- | दि.१२/०३/२०२२ ते १७/०३/२०२२ | |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

१) वरील कामाच्या निविदा मोहोरबंद पाकिटात मा.सरपंच, ग्रामपंचायत वहाळ यांचे नावे दि.१९/०३/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

२) ठेकेदार नोंदणीकृत असावा.

३) कोणतीही एक किंवा सर्वच निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

४) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दि.१९/०३/२०२२ रोजी सायंकाळी ठिक ०४.०० वाजता मा.सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

५) कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारांस कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

६) सदर कामांचे अंदाजपत्रक ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

ठिकाण : वहाळ
दिनांक : ११/०३/२०२२

**सही/-**
**(नंदकिशोर कृष्णा भगत)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत वहाळ**

**सही/-**
**(सौ.पुजा समीर पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत वहाळ**